O/C

# मिरा भाईंदर महानगरपालिका

(38)


मुख्य लेखापरीक्षक यांचे कार्यालय

स्व.इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प). ता.जि.ठाणे-401 101, दुरध्वनी क्र : 28192828


जा.क्र.मनपा/मुलेप/123/2019-20

दि.02/03 /2020.

प्रति,

श्री.राजीव त्रिंबक देशपांडे.
बी/15,नुतन निवास,वीर सावरकर नगर,
वसई रोड, वसई (प)

विषय:- मिरा भाईंदर महानगरपालिका मालकी नसलेल्या रस्त्यासाठी सुमारे 11 करोड रुपयाहुन अधिक निधी खर्च करुन ठेकेदारास देयक अदा करण्यास मंजुरी देण्याबाबत..

संदर्भ:- आपला दि.13/02/2020 रोजीचा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वयचा अर्ज...(दि.08/01/2020 व दि.24/01/2020)

महोदय,

उपरोक्त संदभिय अर्जान्वये अपेक्षिलेली माहिती खालील प्रमाणे आहे.

मुदद क्र.अ :- दि. 06 जानेवारी 2020 व दि. 24 जानेवारी 2020 रोजीचे तक्रार अर्ज बांधकाम विभागाशी संबंधित असल्याने सदर अर्ज अनुक्रमे दि.08/01/2020 वदि.27/01/2020 रोजी उचित कार्यवाहीसाठी बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यात आलेले आहेत. त्याबाबतच्या प्रती सोबत जोडल्या आहेत.

मुदद क्र.ब :- या कार्यालयाच्या अभिलेख्या नुसार माहिती निरंक

मुदद क्र.क :- या कार्यालयाच्या अभिलेख्या नुसार माहिती निरंक

मुदद क्र.ड:- या कार्यालयाच्या अभिलेख्या नुसार माहिती निरंक

मा. अपिलिय अधिकारी तथा
उपमुख्यलेखा परिक्षक,
मिरा भाईदर महानगरपालिका.

सर्व हक्क राखुन
[signature]
-3-2020

माहिती अधिकारी तथा
सहा. लेखापरीक्षक
मिरा भाईदर महानगरपालिका

# जोडपत्र (अ)

माहितीचा अधिकार अधिनियम २००५

प्रति,

मा: जनमाहिती अधिकारी,
लेखा परिक्षण विभाग,
मिराभाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), जि:- ठाणे.

लेखा परिक्षण विभाग
आवक:- 38/2020
दिनांक:- 13/02/2020

१. अर्जदाराचे संपूर्ण नाव : राजीव जिंबक देशपांडे.

२. पत्ता : बी/१५, नूतन निवास, वीर सावरकर नगर, वसई रोड (पश्चिम), वसई-४०१२०२.

३. माहितीचा विषय: — मिराभाईंदर महानगरपालिका मालकी नसलेल्या रस्त्यासाठी सुमारे ११ करोड रुपयांहून अधिक निधी खर्च करुन ठेकेदारास देयक अदा करण्यास मंजुरी देण्याबाबत. (दि: ८-१-२०२० व दि: २४-१-२०२० अर्ज)

४. माहीतीशी संबंधीत कालावधी: — आजतागायत

५. माहितीचे वर्णन: — अ] दि: ६ जानेवारी २०२० व दि. २४ जानेवारी २०२० रोजी गोल्डन नेस्ट पोलीस चौकी ते हनुमान मंदिर या रस्त्यासाठी क्रॉक्रीटीकरण करुन मिराभाईंदर महापालिका निधी सुमारे ११ करोडहून अधिक खर्च केल्याप्रकरणी दाखल तक्रार अर्जाबाबत लेखापरिक्षण विभागामार्फत केलेल्या कारवाईबाबत साक्षांकीत माहिती पुरविणे.

ब] मिराभाईंदर महापालिका मालकी (सात-बारा हक्क नोंद) नसतानाही रस्त्यासाठी सुमारे ११ करोडहून अधिक निधी खर्च करुन पारित देयकांना ज्या नियम-कायदा आधारे मंजुरी देण्यात आली त्यांची साक्षांकीत माहिती पुरविणे.

क] वरील विषयांकीत प्रकरणी ठेकेदारामार्फत सादर देयकांच्या प्रतीसह सार्वजनिक बांधकाम विभाग अधिकाऱ्यांनी सादर एम. बी. बुक (मोजमाप पुस्तिका) तसेच करारनाम्यामधील अटी शर्तींनुसार सर्व आवश्यक दाखल्यांची लेखापरिक्षण अधिकाऱ्यांनी पडताळणी केल्याबाबत सादर अहवालाच्या साक्षांकीत प्रती पुरवि[णे]

ड] वरील विषयांकीत रस्त्याच्या कॉंक्रीटीकरणासाठी पारित निधी (मंजूर देयकानुसार) करण्यास मान्यता देणाऱ्या अधिकाऱ्यांची नांवे, पदनाम, कार्यरत विभाग याबाबत साक्षांकीत माहिती पुरविणे.

६. माहिती टपालद्वारे हवी की व्यक्तिश : — व्यक्तिश:

दिनांक: — १३ फेब्रुवारी २०२०

अर्जदाराची स्वाक्षरी

[signature]

(राजीव जिंबक देशपांडे)
मोब. - ९१७५९८७९०२
९४२३३६४८२६

rm No.2

नमुना नं. २

See Rule 12, 110 (2) 114
116, (2) and 117, (1) (2) & (3)

# मिरा - भाईंदर महानगरपालिका

## सर्वसाधारण पावती

पु. क्र. 5845

R. No.: 854414

श्री. [illegible] यांच्याकडून माहिती अधिकार बद्दल

९०/- रुपये (अक्षरी रु. नव्वद रुपये मात्र मिळाले )

दिनांक 13/02/2020

लिपीकाची सही

रोकड वहीत नोंद केली.

लेखापाल / रोखपाल

प्राधिकृत अधिकाऱ्याची सही

पृष्ठ क्रमांक

राजीव त्रिंबक देशपां
बी-१५, नूतन निवास",
वीर सावरकर नगर,
वसई रोड, वसई(प.) ४०
दि. २४ जानेवारी २०

प्रति,
मा. श्री. दिग्विजय चव्हाण,
मुख्य लेखापरिक्षक,
लेखापरिक्षण विभाग,
मिराभाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), जि. :- ठाणे.

विषय :- मिराभाईंदर महापालिका मालकी नसलेल
रस्ता कॉंक्रीटीकरण करण्यासाठी सुमारे
करोड रुपयांहून अधिक निधी खर्चाबाब
मान्यता देवून ठेकेदारास देयक अदा कर
मंजुरीबाबत.

संदर्भ :- १) दि. ६ जानेवारी २०२० रोजीचा तक्रार
२) दि. १५-११-२०१७ रोजी पारित तत्कालिन
सूचना पत्र.
३) दि. १७-१-२०२० चे कार्यकारी अभियंता
यांचे दि. २३ जानेवारी २०२० रोजी प्राप्त

महोदय,

आपणांस तक्रार अर्ज असा की, वरील विषयां
प्रकरणी मिराभाईंदर महानगरपालिका ११ करोड हून अधिक
निधी महापालिका मालकी नसलेल्या रस्त्याच्या कॉंक्रीटी
साठी खर्च करण्यात आल्याचे आपल्या निदर्शनास संदर्भ
नुसार आणले. सदर प्रकरणी आपण चौकशी करुन मा
कळविणे अपेक्षित असतानाही सदर तक्रारीबाबत कार्यकारी
अभियंता (सा.बां.) यांचेकडे अर्ज वर्ग करण्यात आला. यांचेमार्फ
संदर्भ क्र. ३ नुसार प्राप्त पत्राने रस्त्याची मालकी महानगर
ची नसल्याचे उघड झाले आहे. त्यानुसार सदर प्रकरणी आ
संदर्भ क्र. २ नुसार माहिती घेवून, महापालिका निधीच्या
गैरवापर प्रकरणी तत्काळ विनाविलंब कारवाई करावी. अन्
पुढील कोर्टदशीर कारवाईस आपण जबाबदार रहाल याबा
नोंद घ्यावी.

(राजीव देशपांडे)

२१.४

26.01.2020

४७
२४/१/२०२०

दूरध्वनी : २८१९२८२८ / २८१९३०२८ / २८१८११८३ / २८१८१३५३ / २८१४५९८५
फॅक्स : २८१९७६३६

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय भाईंदर

# MIRA-BHAINDAR MUNICIPAL CORPORATIO

स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे-४०११०१

क्र.: मनपा/सा.बां./१००८९/२०१९-२०. दिनांक : १७/०१/२०२०

प्रति,
**श्री.राजीव देशपांडे**
बी-15, नुतन निवास
वीर सावरकर नगर
वसई रोड, वसई (प.) 401202

**विषय** :- मिरा-भाईंदर महापालिकेच्या मालकी नसलेल्या रस्त्यासाठी सुमारे 11 करोड रुपयाहुन अधिक निधी खर्च करुन ठेकेदारास देयक अदा करण्यास मंजुरी दिल्याबाबत...

**संदर्भ** :- आपलेकडील दि.06 जानेवारी 2020 रोजीचे पत्र.

वरील संदर्भिय पत्राच्या अनुशंगाने आपणांस कळविण्यात येते की, मिरा-भाईंदर शहराच्या मंजुर विकास योजनेत गोल्डन नेस्ट पोलिस चौकी ते हनुमान मंदिरापर्यंत चा रस्ता हा 30 मीटर रुंदीचा दर्शविण्यात आलेला आहे. सदर रस्ता हा सन 1995 पुर्वीपासून वापरात असून सार्वजनिक स्वरुपाचा आहे. सदर रस्त्यालगत असलेल्या इमारतींना परवानगी देताना रस्त्याखालील जागेचा मोबदला देण्यात आलेला असून ज्या जागांचा मोबदला जागा मालकांनी घेतलेला नाही. त्यानी रितसर प्रस्ताव दिल्यास मोबदला देण्याची कार्यवाही नगररचना विभागामार्फत करण्यात येईल. सदर रस्ता हा विकास योजनेतील रस्ता असल्याने महानगरपालिकेमार्फत कामाबाबतच्या आवश्यक त्या सर्व मान्यता घेऊन करण्यात आलेला आहे. सदर वस्तुस्थिती आपणांस कळविण्यात येत आहे.

(दिपक खांबित)
**कार्यकारी अभियंता (साबां)**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

<u>प्रत माहितीसाठी</u>

1) **मा.शहर अभियंता**
2) **मा.मुख्य लेखपरिक्षक**

PC-09/VP/2019-20/DK/L-49

कालमर्यादा

लेखा परिक्षण विभाग
आवक :- ४९
दिनांक :- ०८/०१/२०२०

राजीव त्रिंबक देशपांडे,
बी-१५, नूतन निवास,
वीर सावरकर नगर,
वसई रोड, वसई (प.)-४०१२०२
दिनांक ६-जानेवारी २०२०

प्रति,
मा. श्री. दिग्विजय चव्हाण सो.
मुख्य लेखा परिक्षण अधिकारी,
मिराभाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), जि. – ठाणे.

विषय :– मिराभाईंदर महापालिकेच्या मालकी नसलेल्या रस्त्यासाठी सुमारे ११ करोड रुपयांहून अधिक निधी खर्च करून ठेकेदारास देयक अदा करण्यास मंजुरी दिल्याबाबत.

संदर्भ :– दि. २७-८-२००९ रोजी नगररचना विभागाने सदर रस्ता मालकी नसल्याचे पारित केले

महोदय,

आपणांस तक्रार अर्ज असा की, भाईंदर पूर्वेस गोल्डन नेस्ट पोलीस चौकी ते हनुमान मंदिरापर्यंत रस्ता क्रॉंकीटीकरण ठेका मे. देव इंजिनिअर्स यांना १९.३०% जास्त दराने रु. १०,४५,२२,८५०/- अंदाजित रकमेस मंजूर करण्यात आला. सदर रस्त्याची मालकी सात-बारा नोंदनुसार मिराभाईंदर महापालिकेची नसल्याचे नगररचना विभागातील जनमाहिती अधिकाऱ्यांनी कळविल्याने मिराभाईंदर महापालिका मालकी नसलेल्या रस्त्यासाठी सुमारे ११ करोड रुपयांहून अधिक महापालिका निधीचा वापर कोणत्या शासन नियमानुसार करून ठेकेदारास देयकाची रक्कम देण्यात आली त्याबाबत विहीत कालमर्यादेत अर्जदारास कळविण्यात यावे.

सदर प्रकरणी शासन नियम डावलून पालिकांत गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांची जबाबदारी निश्चित करून गुन्हा दाखल करावा.

(स्वाक्षरी)
(राजीव देशपांडे)
मो. 917598790

ल. अ.
उचित कार्यवाही करून अर्जदारास कळवावे
(स्वाक्षरी) ८.०१